# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.३१** **विषय क्रमांक - ३१**

दिनांक : ०७/०३/२०२४ विभाग : नगररचना विभाग.:

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ३१<br>दिनांक<br>०७/०३/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21 (2) च्या अनुषंगाने कलम 23 (1) सह कलम 38 अन्वये सुधारीत (मुळ हद्द दुसरी+ वाढीव क्षेत्र पहिली) विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे व कलम 24 नुसार नगररचना अधिकारी यांची नियुक्ती करणे. |
| ठराव क्रमांक - ३१<br>दिनांक<br>०७/०३/२०२४ | महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23 (1) सह कलम 38 अन्वये अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत विकास योजना : मुळ हद्द (दुसरी सुधारीत योजना) + वाढीव क्षेत्र (पहिली सुधारीत योजना) या एकत्रित क्षेत्राची तयार करणेचा इरादा जाहीर करणेसाठी सदर ठरावान्वये ही सभा मान्यता देण्यांत येत आहे.<br>महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23 (2) नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या एकुण क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व आयुक्त यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा अहमदनगर महानगरपालिकेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यांत यावा.<br>उक्त सुधारीत विकास योजना तयार करण्याचा अहमदनगर महानगरपालिकेचा इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सुचनेव्दारे प्रसिध्द करणेंत यावा. सदरची सूचना, महाराष्ट्र शासनाचे राजपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासुन ६० दिवसाच्या कालावधीत प्राप्त होणा-या नागरिकांच्या सूचना हरकतींचा विचार विकास योजना तयार करतांना करण्यांत येईल.<br>तसेच उक्त नमुद सुधारीत विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता, त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन अहमदनगर महानगरपालिकेकडे सादर करण्याकरीता त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्यासाठी व त्यासंबंधी इतर सर्व कामे करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये उपसंचालक नगररचना विकास योजना विशेष घटक यांची व नगररचना विभागाच्या सक्षम प्राधिकरणाने नामनिर्देशीत व्यक्ती यांची "नगररचना अधिकारी " म्हणुन नेमणूक करणेसाठी मान्यता देण्यांत येत आहे. नगररचना अधिकारी यांच्या नेमणुकीसह मा.सह संचालक, नगररचना , नाशिक विभाग, नाशिक यांची पुर्व मंजूरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. व त्यांनी मंजूरी दिल्यानंतर नगररचना अधिकारी यांच्या नियुक्तीचे औपचारीक आदेश मा.आयुक्त यांनी पारीत करावे. |

| | |
|---|---|
| | -२-<br>उपरोक्त सुधारीत विकास योजना तयार करण्याच्या कायदेशीर बाबीवर कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यांत येत आहेत. तद्संबंधी लागणा-या सर्व खर्चास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.
अहमदागर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.
अहमदागर ४१४००१.